ऑनलाईन साप्ताहिक वाचण्यासाठी
आमचा क्युआर कोड स्कॅन करा.


साप्ताहिक

# गोदावरी

RNI Regd. No.: MAHMAR/1999/7490

परिवार पोस्ट रजि.नं.-AR/TECH NO RNP-JAL/120/2019-21

* वर्ष २३ वे * अंक ४६ * सोमवार १४/११/२०२२ * डाक १६/११/२०२२ * पाने - ६ * किंमत २ रुपये




## बालदिनाच्या शुभेच्छा...



*मनाची निरागसता,*
*हृदयाची कोमलता,*
*ज्ञानाची उत्सुकता,*
*भविष्याची आशा,*
*उद्याचा भारत देश*
*घडविणाऱ्या*
*बाळगोपाळांना*
*बालदिनाच्या*
***शुभेच्छा:!***



*(दि. १४ नोव्हेंबर) बालदिनी गोदावरी फाऊंडेशनच्या प्रेरणास्त्रोत गोदावरी आई यांचा आपल्या पणती कु. किवा व सारा यांच्यासोबत आनंदाचे क्षण घालविताना छायाचित्र टिपले आहे छायाचित्रकार नितीन नेवे यांनी.*

# खा. राहूल गांधी यांनी घेतला खान्देशी भरीत-भाकरीचा आस्वाद

### * भारत जोडो यात्रेसाठी डॉ. उल्हास पाटील यांच्याकडून ६ क्विंटल वाग्यांचे भरीत

**जळगाव - काँग्रेसचे नेते खा. राहुल गांधी यांची भारत जोडो यात्रा महाराष्ट्रात दाखल झाली आहे. या यात्रेत त्यांच्यासमवेत हजारो पदाधिकारी, कार्यकर्ते आणि सर्वसामान्य जनताही सहभागी झाली आहे. यात्रेदरम्यान खा. राहुल गांधी यांनी खान्देशी भरीताचा आस्वाद घेतला. काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष माजी खा. डॉ. उल्हास पाटील यांच्यातर्फे तब्बल ६ क्विंटल वांग्याचे भरीत आणि भाकरीची व्यवस्था करण्यात आली आहे.**



### यांनी केले सहकार्य

**खान्देशी पाहुणचारासाठी गोदावरी आयएमआर महाविद्यालयाचे संचालक डॉ. प्रशांत वारके, वैद्यकीय महाविद्यालयाचे वरीष्ठ लेखापाल योगेश पाटील, बापू नेमाडे, नरेंद्र पाटील, रोशन महाजन यांच्यासह गोदावरी फाऊंडेशनच्या सदस्यांनी सहकार्य केले.**

खान्देशात आलेल्या पाहुण्यांनी इथल्या वांग्याच्या भरीताची चव चाखली नाही तर गोष्टच वेगळी. संपूर्ण राज्यभरात वांग्याचे भरीत, भाकरी, दह्याची कोशिंबीर हा खान्देशी पाहुणचार प्रसिध्द आहे. गुलाबी थंडीत भरीत-भाकरीची चव नक्कीच पंचपकवान्नापेक्षा आस्वाद देणारी ठरते. त्यामुळे या खान्देशी पाहुणचाराला मोठे महत्व आहे. देशात राजकीय परीवर्तनासाठी काँग्रेसचे नेते खा. राहुल गांधी यांनी कन्याकुमारीपासून भारत जोडो यात्रेला सुरूवात केली आहे. ही यात्रा नुकतीच महाराष्ट्रात नांदेडमार्गे दाखल झाली आहे. खा. राहुल गांधी यांच्या समवेत हजारो पदाधिकारी, कार्यकर्ते आणि सर्व सामान्य नागरिकही सहभागी झाले आहेत.

### खा. राहुल गांधींनी घेतला भरीताचा आस्वाद

खा. राहुल गांधी आणि भारत जोडो यात्रेतील यात्रेकरूंसाठी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष माजी खा. डॉ. उल्हास पाटील यांच्यातर्फे तब्बल १० हजार जणांसाठी खान्देशी भरीत, भाकरी, दह्याची कोशिंबीर अशा बेताचे नियोजन करण्यात आले होते. यासाठी तब्बल ६ क्विंटल वांगे उपलब्ध करून देण्यात आले आहे. तसेच खान्देशी भरीत तयार करण्यासाठी डिंगबर कोल्हे या खाद्य तज्ञावर जबाबदारी सोपविण्यात आली होती. डिंगबर कोल्हे यांनी तयार केलेल्या खान्देशी भरीत आणि भाकरीचा काँग्रेसचे नेते खा. राहुल गांधी यांनी अक्षरश : बोटे चाखत आस्वाद घेतला. तसेच यात्रेत सहभागी झालेल्या यात्रेकरूंनीही खान्देशी पाहुणचारावर चांगलाच ताव मारला.

# देश एकसंघ होत असल्याची अनुभूती

### माजी खा.डॉ.उल्हास पाटील यांचे प्रतिपादन

**नांदेड - काँग्रेस पक्षाचे नेते खासदार राहूल गांधी यांनी कन्याकुमारीपासून भारत जोडो यात्रा सुरु केलेली आहे. या यात्रेच्या माध्यमातून लाखो देशवासिय एकजुट होवून देश एकसंघ होण्याची अनुभूती येत असल्याचे प्रतिपादन काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी खासदार डॉ.उल्हास पाटील यांनी केले.**

काँग्रेसचे खासदार राहूल गांधी यांची भारत जोडो यात्रा महाराष्ट्रात नांदेड मार्गे दाखल झाली आहे. या यात्रेत काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आमदार नाना पटोले, माजी मंत्री अशोक चव्हाण, बाळासाहेब थोरात, प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी खासदार डॉ.उल्हास पाटील, आमदार शिरिष चौधरी, जिल्हाध्यक्ष प्रदिप पवार यांच्यासह अनेक नेते सहभागी झाले आहे. या यात्रेसंदर्भात डॉ.उल्हास पाटील यांनी अनुभव कथन केले आहे. डॉ.उल्हास पाटील यांनी सांगितले की, खा.राहूल गांधी यांच्या भारत जोडो यात्रेत युवापिढीचा मोठ्या संख्येने सहभाग होत आहे. देशातील सध्याची राजकीय परिस्थीती, आर्थिक विकास या विषयीचे राहूल गांधीचे भाष्य हे युवा पिढीला आकर्षित करणारे ठरत आहे. समाजातील शेवटच्या घटकाच्या प्रत्येक समस्यांवर खा.राहूल गांधी हे प्रकाशझोत टाकत आहे. या यात्रेचा समारोप श्रीनगर येथे होणार असून संपूर्ण देश खासदार राहूल गांधी यांच्या नेतृत्वाखाली एकसंघ होईल, असा विश्वास डॉ.उल्हास पाटील यांनी व्यक्त केला.





दांडी यात्रेनंतर खा.राहूल गांधी यांची ही भारत जोडो यात्रा परिवर्तनाची नांदी ठरेल, असेही डॉ.उल्हास पाटील यांनी सांगितले.

# वरणगाव : मोफत टू डी इको तपासणी शिबिराचा नागरिकांना लाभ


**वरणगाव - भुसावळ तालुका काँग्रेस कमिटी व वरणगाव शहर कमिटीतर्फे मंगळवार दि.८ नोव्हेंबर रोजी आयोजित भव्य आरोग्य तपासणी शिबिराप्रसंगी गोदावरी फाऊंडेशनच्या सदस्या डॉ.केतकीताई पाटील यांनी विशेष उपस्थिती दिली. याप्रसंगी आयोजकांनी पुष्पगुच्छ देत ताईंचे स्वागत केले असून पिता का नाम बेटी कर रही है रोशन असे बोलत आशिर्वादही दिले.**

यावेळी तालुका काँग्रेस कमिटीचे शहराध्यक्ष अशफाक काझी, मनोज देशमुख, अकील शहा, पंकज पाटील, ज्ञानेश्वर पाटील, राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष दीपक मराठे, राष्ट्रवादी काँग्रेस चे गटनेते राजेंद्र चौधरी, शेख आसिफ शेख हुसेन, नगरसेवक रवी भाऊ सोनवणे, डॉ मुबशशिर खान, शिवसेना उपशहर प्रमुख सुनील भोई, संजय कोळी, शेख सईद शेख भिकारी, शफी सर, कादर मणियार, हबीब सर, इकबाल काझी, के बी काझी आदी उपस्थित होते.



शिबिराप्रसंगी डॉ.उल्हास पाटील रुग्णालयातील निवासी डॉ.दिनेश, डॉ.अमेय, डॉ.अंजली, डॉ.चारुशिला, डॉ.पियूष यांनी रुग्णांची तपासणी केली असून त्यांना नर्सिंग स्टाफचेही सहकार्य लाभले. शिबिरात १९७ नागरिकांची तपासणी करण्यात आली असून ४० रुग्णांना पुढील उपचारासाठी रुग्णालयात सोमवार दि.१४ नोव्हेंबर रोजी रुग्णालयात येण्याचा सल्ला दिला.

### तालुका व शहर काँग्रेस कमिटीतर्फे डॉ.केतकीताई पाटील यांचे स्वागत



रुग्णालयातर्फे वाहनव्यवस्थाही उपलब्ध करुन देण्यात आली आहे. यात मेडिसीन ४, सर्जरी ५, डोळ्यांचे ८, ऑर्थोचे ५, कान नाक घशाचे ४ आणि कार्डियाकचे १४ रुग्णांचा समावेश आहे. या रुग्णांवर महात्मा ज्योतिबा फुले योजनेंतर्गत रुग्णालयात उपचार केले जाणार आहे. डॉ उल्हास पाटील रुग्णालयाने उपलब्ध करून दिलेल्या आरोग्य सेवा, शिबिरासाठी आयोजकांनी आभार मानले.



# कुऱ्हाकाकोड्यात भरला आरोग्याचा मेळा

**कुऱ्हाकाकोडा – मंगळवार, ८ नोव्हेंबर रोजी कुऱ्हाकाकोड्यात आयोजित आरोग्य शिबिरास कुऱ्हाकाकोडावासियांचा उदंड प्रतिसाद लाभला. शिबिरस्थळी डॉ.उल्हास पाटील, रूग्णालयाच्या तज्ञांनी नागरिकांची तपासणी केली.**



शिबिरामध्ये हृदयविकाराचे निदान करणारी टू डी इको अर्थात हृदयाची सोनोग्राफीही मोफत करण्यात आली. डॉ.उल्हास पाटील रुग्णालयातील मेडिसीन विभागाचे निवासी डॉ.आकाश जाधव, सर्जरी श्रीधर माधव, नेत्ररोग निवासी डॉ.शिफा मिर्झा, ऑर्थोचे डॉ. चाणक्य, स्त्रीरोग तज्ञ सायली, तसेच नाक कान घसा तज्ञ डॉ रितू रावल यांनी रुग्णांची तपासणी केली.

डॉक्टरांनी शिबिरात आलेल्या सर्व रुग्णांच्या शंकाचे निरसन केले. शिबिरार्थीची नावनोंदणी, तपासण्यांसाठी आवश्यक असलेली तयारीचे कामकाज नर्सिंग स्टाफने पाहिले. शिबिरात ५२ रूग्णांची तपासणी करण्यात येवून अस्थीरोग १, नेत्ररोग ४ मेडीसिन २, सर्जरी २, स्त्रीरोग १ आणि नाक कान घसा १ अशा ११ रूग्णांना पुढील उपचाराचा सल्ला देण्यात आला. काही रुग्णांना शस्त्रक्रिया, एन्जीओग्राफीची गरज असल्याने त्यांना रुग्णालयात येण्यास सांगण्यात आले. रुग्णालयात महात्मा ज्योतिबा फुले योजनेंतर्गत मोफत उपचार केले जाणार आहे.

## आरोग्य शिबिरास एनगाववासियांचा उदंड प्रतिसाद



**एनगाव** – सोमवार, ७ नोव्हेंबर रोजी आयोजित आरोग्य शिबिरास एनगाव वासियांचा उदंड प्रतिसाद लाभला. शिबिरस्थळी डॉ.उल्हास पाटील, रूग्णालयाच्या तज्ञांनी नागरिकांची तपासणी केली.

शिबिरा मध्ये हृदयविकाराचे निदान करणारी टू डी इको अर्थात हृदयाची सोनोग्राफीही मोफत करण्यात आली. डॉ.उल्हास पाटील रुग्णालयातील मेडिसीन विभागाचे निवासी डॉ.अब्दुला मोमीन, सर्जरी डॉ.अमेय लोखंडे, नेत्ररोग निवासी डॉ.अंजली मयेकर,ऑर्थोचे डॉ.पियूष यांनी रुग्णांची तपासणी केली. डॉक्टरांनी शिबिरात आलेल्या सर्व रुग्णांच्या शंकाचे निरसन केले. शिबिरार्थीची नावनोंदणी, तपासण्यांसाठी आवश्यक असलेली तयारीचे कामकाज नर्सिंग स्टाफने पाहिले. शिबिरात १६ रूग्णांची तपासणी करण्यात येवून हृदयरोग ०१ अस्थीरोग ०३ नाक कान घसा ०१ अशा ५ रूग्णांना पुढील उपचाराचा सल्ला देण्यात आला. काही रुग्णांना शस्त्रक्रिया, एन्जीओग्राफीची गरज असल्याने त्यांना रुग्णालयात येण्यास सांगण्यात आले. रुग्णालयात महात्मा ज्योतिबा फुले योजनेंतर्गत मोफत उपचार केले जाणार आहे.

## लोहाऱ्यात ४१ बालकांची तपासणी

डॉ. उल्हास पाटील वैद्यकिय रूग्णालयातर्फे जिल्हयात बालआरोग्य अभियान राबवले जात असून या अभियानार्तगत दि ७ नोव्हें रोजी लोहारा येथील शिबिरात ४१ बालकांची तपासणी बालरोग तज्ञ डॉ. उमाकांत अणेकर यांच्या टीमने केली.

शिबिरात बालकांची तपासणी केल्यानंतर ९ बालकांना पुढील उपचाराची गरज असल्याचे लक्षात आल्याने पालकांना पुढील उपचारार्थ रूग्णालयात येण्याचा सल्ला व मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी सहायक तज्ञ डॉक्टर, परिचारीका, यासह जनसंपर्क अधिकारी उपस्थीत होते. या ९ बालकांवर महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेत पुढील उपचार मोफत होणार आहे



## पिंपळखेड आरोग्य शिबिरात रुग्णांच्या आजाराचे निदान



**भडगाव** – तालुक्यातील पिंपळखेड येथील सिव क्लिनिक येथे शुक्रवार, दि.११ नोव्हेंबर रोजी महाआरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले असून शिबिरातील रक्तदाब तपासणीसह ईसीजी तपासणीमुळे रुग्णांच्या आजाराचे निदान झाले.

शिबिरात इएनटी निवासी डॉ.रितू रावल, मेडिसीनचे डॉ.दिनेश चौधरी, डॉ.जीवक काकडे, स्त्रीरोग विभागातील निवासी डॉ.आफिया खान, डॉ.नेहा पटेल, नेत्रविभाग निवासी डॉ. आशुतोष गिरबिडे, ऑर्थोचे डॉ.पियूष पवार, सर्जरीचे डॉ. स्मृती भोजने, मैत्रेयी बिरादर आदिंनी रुग्णांची तपासणी केली. काही रुग्णांना मुतखडा, प्रोस्टेट, थायरॉईड, हर्नियासह अन्य शस्त्रक्रियांची गरज असल्याने रुग्णालयात येण्याचा सल्ला दिला आहे. महात्मा ज्योतिबा फुले योजनेंतर्गत रुग्णांवर डॉ.उल्हास पाटील रुग्णालयात उपचार केले जाणार आहे. शिबिरासाठी रुग्णालयातील मार्केटिंग टिमसमवेत डॉ.प्रमोदकुमार दिनकर पाटील, बापू महाजन यांचे सहकार्य लाभले.

## हडसन येथे ४६ नागरिकांची तपासणी

हडसन – मंगळवार, ८ नोव्हेंबर रोजी हडसन येथे आयोजित आरोग्य शिबिरास हडसनवासियांचा उदंड प्रतिसाद लाभला. शिबिरस्थळी डॉ.उल्हास पाटील, रूग्णालयाच्या तज्ञांनी नागरिकांची तपासणी केली.



शिबिरामध्ये हृदयविकाराचे निदान करणारी टू डी इको अर्थात हृदयाची सोनोग्राफीही मोफत करण्यात आली. डॉ.उल्हास पाटील रुग्णालयातील मेडिसीन विभागाचे निवासी डॉ.कलीमोद्दीन, नेत्ररोग निवासी डॉ.अंजली मयेकर,ऑर्थोचे डॉ. आशिष यांनी रुग्णांची तपासणी केली. डॉक्टरांनी शिबिरात आलेल्या सर्व रुग्णांच्या शंकाचे निरसन केले. शिबिरार्थीची नावनोंदणी, तपासण्यांसाठी आवश्यक असलेली तयारीचे कामकाज नर्सिंग स्टाफने पाहिले. शिबिरात ४६ रूग्णांची तपासणी करण्यात येवून अस्थीरोग २, नेत्ररोग २ मेडीसिन ४ आणि नाक कान घसा १ अशा ९ रूग्णांना पुढील उपचाराचा सल्ला देण्यात आला. काही रुग्णांना शस्त्रक्रिया, एन्जीओग्राफीची गरज असल्याने त्यांना रुग्णालयात येण्यास सांगण्यात आले. रुग्णालयात महात्मा ज्योतिबा फुले योजनेंतर्गत मोफत उपचार केले जाणार आहे.

## संक्षिप्त



### सांगवी बुद्रुक रहिवाशांना शिबिराचा लाभ

**रावेर** – तालुक्यातील सांगवी बुद्रुक येथे पंचायत समिती यावलचे गटनेते शेखर सोपान पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त युवराज भंगाळे, दिपक चौधरी, शेखरदादा मित्र परिवार व गोदावरी फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सांगवी बुद्रुक येथे शनिवार, १२ नोव्हेंबर रोजी महाआरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले.

मराठी मुलींची शाळा येथे घेण्यात आलेल्या शिबिरात मोफत ईसीजी, ब्लड शुगर, टू डी इको तपासणी करण्यात आली. हृदयविकारी रुग्णांसाठी शिबिर खुप महत्वाचे ठरले असून यात काही रुग्णांना हृदयविकाराची लक्षणे दिसून आल्याने एन्जीओग्राफीसाठी रुग्णालयात येण्याचा सल्ला दिला आहे. महात्मा ज्योतिबा फुले योजनेंतर्गत रुग्णांवर उपचार केले जाणार आहे. शिबिरस्थळ सरपंच रशीद तडवी, उपसरपंच विकास धांडे, पिरन महेबुब तडवी, विक्रम मेघे, प्रकाश सोनवणे, निखिल पाटील, भूषण धनगर, अतुल फिरके, आनंद मेघे, मयूर तडवी, चंद्रकांत तावडे, शशिकांत मेघे, प्रमोद नेमाडे, कैलास कोळंबे, किरण भंगाळे, निलेश पाटील, पंकज भंगाळे, समीर तडवी, सागर मेघे, श्रीराम आढाळे यांनी शिबिराला भेट दिली. यशस्वीतेसाठी कोमल तायडे, राहुल जयकर, मनोज करनकाळे, चेतन कोळी, मयूर भंगाळे, सेजल भंगाळे, भूषण भंगाळे, कोमल भंगाळे, केदार चौधरी आदिंनी सहकार्य केले.



### अडगाव: नागरिकांच्या डोळ्यांची तपासणी

**वऱ्हाणपूर** – जिल्ह्यातील अडगाव येथील नागरिकांच्या डोळ्यांच्या तपासणीसाठी गोदावरी फाऊंडेशनतर्फे महाआरोग्य तपासणी शिबिर शनिवार, १२ नोव्हेंबर रोजी घेण्यात आले. शिबिरातील काही रुग्णांना मोतिबिंदू तसेच डोळ्यांचे काही समस्या आढळून आल्यात, त्यावर शस्त्रक्रिया करावी लागणार असून त्या रुग्णांना पुढील उपचारासाठी रुग्णालयात येण्याचा सल्ला दिला आहे.

शिबिरात रुग्णांची तपासणी निवासी डॉ.अंजली मयेकर, डॉ.आशुतोष यांनी केली. रुग्ण जर मध्यप्रदेशातील रहिवाशी असतील तर त्यांना प्रधानमंत्री आयुष्यमान भारत योजनेंतर्गत तर महाराष्ट्रातील रहिवाशांसाठी महात्मा ज्योतिबा फुले योजनेंतर्गत शस्त्रक्रिया केल्या जाणार आहे. त्यासाठी रुग्णांनी सोबत येतांना आधार कार्ड व रेशन कार्ड तसेच आवश्यक योजनेचे कार्ड सोबत आणावे असे समुपदेशन करण्यात आले.

## दिपोत्सवानंतर आयोजित नेत्रविकार शिबिराचा पाचोऱ्यातील लहानग्यांसह वयोवृद्धांनाही लाभ

**पाचोरा – दिवाळीतील फटाक्यांच्या आतषबाजीनंतर डोळ्यांची तपासणीची आवश्यकता असते, त्यानिमित्त पाचोऱ्यात कामगार कल्याण मंडळाजवळ बुधवार, २ नोव्हेंबर रोजी नेत्रविकार तपासणी व शस्त्रक्रिया शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात लहानग्यांसह वयोवृद्ध तसेच सर्वच शिबिरार्थीच्या डोळ्यांची तपासणी करण्यात आली.**

युवा फाऊंडेशन सोशल मिडीयाचे सचिन सोमवंशी, राहूल शिंदे उर्फ मुन्नाभाऊ यांच्या वाढदिवसानिमित्त व स्व.अमोलभाऊ शिंदे यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त नेत्रविकार तपासणी व महाशस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात नेत्रविकार तज्ञ डॉ.कल्पना देशमुख, डॉ.आकाश, डॉ.अंजली यांनी रुग्णांची तपासणी केली. तसेच सर्जरीचे निवासी डॉ. सेजोल कश्यप, डॉ.स्मृती भोजने, डॉ.श्रीधर माधवराव यांनी रुग्णांची तपासणी केली. काही रुग्णांना मोतिबिंदू शस्त्रक्रिया तसेच काहींना तिरळेपणा असल्याने रुग्णालयात येण्याचा सल्ला दिला आहे. डॉ.उल्हास पाटील रुग्णालयात महात्मा ज्योतिबा फुले योनजेंतर्गत मोफत शस्त्रक्रिया केल्या जाणार आहे. शिबिर यशस्वीतेसाठी मुन्ना शिंदे, सुनील भोई, दादू चौधरी, विशाल लिंगायत यांच्यासह अष्टविनायक मित्र मंडळ, दत्तगृप बाहेरपुरा, युवा प्रतिष्ठान आदिंचे सहकार्य लाभले.



## मांडवा बुद्रुकमध्ये आरोग्य शिबीर

**मांडवा बु.** – गोदावरी फाऊंडेशनच्या सहकार्याने संजय दादा गरुड व डी.के.पाटील (रा.काँ.पार्टी) मांडवा बुद्रुक यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दि.११ नोव्हेंबर रोजी महाआरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले.

मांडवा बुद्रुक येथील समाज मंगल कार्यालयात सकाळी १० वाजेपासून शिबिरास सुरुवात झाली. यावेळी आयोजकांनी डॉ.उल्हास पाटील रुग्णालयातून आलेल्या डॉक्टरांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. यावेळी इएनटी निवासी डॉ.चारुशिला सोनवणे, मेडिसीनचे डॉ.मोमील अब्दुल्, स्त्रीरोग विभागातील निवासी डॉ.निलिजा बिर्हाडे, नेत्रविभाग निवासी डॉ.शिफा मिर्झा, ऑर्थोचे डॉ.चाणक्य, सर्जरीचे डॉ. श्रीधर माधव आदिंनी रुग्णांची तपासणी केली. गरजेनुसार रुग्णांना औषधोपचार लिहून दिला तर काही रुग्णांना शस्त्रक्रियेची गरज असल्याने रुग्णालयात येण्याचा सल्ला दिला आहे.

रुग्णांनी सोबत येतांना आधार कार्ड व रेशन कार्ड आणण्याचे आवाहन केले जेणेकरुन महात्मा ज्योतिबा फुले योजनेंतर्गत रुग्णांवर उपचार केले जातात. शिबिरासाठी गोपाल भोंबे, राजू जाधव, कैलास आपार, एकनाथ जाधव, सकुद्दीन तडवी, भागवत पाटील, संजय जाधव आदिंचे सहकार्य लाभले.



संपादक : सुभाष पाटील (रजि. न्युजपेपर) साप्ताहिक गोदावरी परिवार : मालक, प्रकाशक, मुद्रक : डॉ. सौ. वर्षा पाटील यांनी अक्षरमुद्रा प्रिंटर्स, प्लॉट नं.६, कलेक्टर बंगल्याच्या बाजूला, साने गुरूजी कॉलनी, जळगांव येथे छापून गोदावरी हॉस्पीटल, भास्कर मार्केट जवळ, जळगांव येथे प्रसिद्ध केले. फोन नं. २२२१८३४/३५, अंकात बातम्या प्रसिध्द करण्यासाठी या ईमेलवर पाठवाव्यात Email : godavari.parivar@gmail.com(अंकात प्रकाशित झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# इच्छाशक्तीच्या बळावर गोदावरी आईंचे कार्तिकस्वामी दर्शन

जळगाव – कार्तिक पौर्णिमेनिमित्त सोमवार, दि.७ नोव्हेंबर रोजी केरळी महिला ट्रस्टच्या कार्तिक स्वामींच्या मंदिरात जाऊन पाटील परिवाराने दर्शन घेतले. याप्रसंगी ८९ वर्षीय श्रीमती गोदावरी पाटील यांनीही आजारपणाला दूर सारत कार्तिक स्वामींचे मनोभावे दर्शन घेत, सर्वांचे कल्याण करं अशी प्रार्थना केली.

शहरातील निवृत्ती नगर मधील केरळी महिला ट्रस्टचे कार्तिक स्वामी मंदीर दि ७ रोजी कार्तिका पौर्णिमा सूरू झाल्याने दु. ४ वा १५ मि. पासून दर्शनासाठी खुले करण्यात आले. त्यानिमित्त गोदावरी फाऊंडेशनच्या प्रेरणास्त्रोत श्रीमती गोदावरी (आई) पाटील, उपाध्यक्ष सुभाष पाटील, सचिव डॉ. वर्षा पाटील, सदस्या प्रमिला भारंबे, डॉ.केतकी पाटील, डीएम कार्डिओलॉजिस्ट डॉ.वैभव पाटील, किवा पाटील, सारा पाटील यांनी कार्तिक स्वामींचे दर्शन घेतले.




याप्रसंगी डॉ.शांताराम सोनवणे, बंडू काळे, राजस कोठवाल, महापौर जयश्री महाजन, देवेंद्र मराठे, राधा नायर यांनी सहकुटूंब सहपरिवार दर्शन घेतले.





## मनोज देशमुख यांच्या निवासस्थानी डॉ.केतकीताई पाटील यांची सदिच्छा भेट



**वरणगाव येथे आयोजित शिबिराप्रसंगी गोदावरी फाऊंडेशनच्या सदस्या डॉ.केतकीताई पाटील यांनी विशेष उपस्थीती दिली. त्यावेळी शिबिराचा आढावा घेतला तसेच नागरिकांच्या आरोग्यविषयक शंकाचे निरसनही केले. शिबिरानंतर श्री.मनोज देशमुख यांच्या आग्रहास्तव डॉ.केतकीताईंनी निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी आरोग्याचे प्रश्न, गावाचा विकास आदि विषयांवर चर्चा करण्यात आली. यावेळी तालुका काँग्रेस कमिटी चे शहराध्यक्ष अशफाक काझी, नगरसेवक रवी भाऊ सोनवणे आदि उपस्थीत होते.**

## डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय पॅथॉलॉजी दिवस साजरा

**जळगाव :** डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयात ९ नोव्हेंबर रोजी आंतरराष्ट्रीय पॅथॉलॉजी दिवस पॅथॉलॉजी विभागातर्फे साजरा करण्यात आला. यावेळी आरोग्य सेवेतील पॅथॉलॉजीचे महत्त्व आणि योगदान यावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी एमबीबीएसचे विद्यार्थी आणि पदव्युत्तर विद्यार्थी सहभागी झाले होते.

चर्चासत्रात प्राध्यापक डॉक्टरांसह विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवित चर्चा घडून आणली.

याप्रसंगी वरुणराज नन्नवरे, डॉ. प्रियंका कांबळे, डॉ. सोमेश शेळके यांनी अनुक्रमे पॅथॉलॉजीच्या शाखा आणि करिअर पर्याय, व्हरटोप्सी, टेलिपॅथॉलॉजीची भूमिका या विषयावर




मत व्यक्त केले. त्यासाठी पॅथॉलॉजी विभागातील डॉ नेहा महाजन आणि डॉ वैशाली नागोसे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ.शिरीष गोंडाणे, डॉ.विपिन तोडसे, डॉ. पूजा खांडवे उपस्थित होते

## स्क्रिझोफेनिया

**स्किझोफ्रेनिया हा एक मानसिक विकार आहे. यामध्ये रुग्णास भास व भ्रम जाणवत असतो. त्यामुळे रुग्णाचे मन गोंधळून जात असते. याचा परिणा म व्यक्तीच्या दैनंदिन वागणुकीत होतो. मात्र वेळीच योग्य उपचार केले गेल्यास, रुग्णास पुढील आयुष्य जगणे सुलभ जाऊ शकते. स्किझोफ्रेनिया होण्यामागे जेनेटिक फॅक्टर, मनावरील आघात, मानासिक तणाव, मेंदूतील डोपामाइन या द्रव्यातील असंतुलन, तसेच काही विशिष्ट औषधे, अमली पदार्थांचे व्यसन यांमुळेही स्किझोफ्रेनिया होण्याचा धोका वाढतो.**

**मुख्य लक्षणे –✻** वागण्यात दिसणारे बदल– स्वत:शीच हसणे व बोलणे, उगाचच हातवारे करणे, निर्थक भटकत राहणे, स्वत:च्याच भ्रमात भटकत राहणे, आरोग्याची देखभाल न करणे, अस्वच्छ राहणे, कपडय़ांचे भान नसणे, आक्रमक होणे, उगाचच कुणाला तरी घाबरणे.



**✻ भावनिक बदल –** परिस्थितीशी न जुळणारे, न शोभणारे भावनिक प्रदर्शन, चेहऱ्यावर वेडेपणाचा भाव, मख्ख चेहरा/ निर्विकार भाव, भावनांचा अनुभव स्वत:लाच जाणवत नाही, आक्रमक भाव, संशयी भाव

**✻ विचारांमधले बदल –** असंबद्ध बोलणे, विचारात सुसूत्रता नसणे, विचारलेल्या प्रश्नांना विसंगत उत्तर देणे, दोन वाक्यांत वा कल्पनेत कुठलाच तर्कशुद्ध संबंध नसणे, त्यांच्या बोलण्याचा अर्थ न समजणे, अचानक मध्येच असंबद्ध बोलणे.

**निदान :** रुग्णातील लक्षणे, कौटुंबिक इतिहास, मानसिक आरोग्य व शारीरिक तपासणी याद्वारे डॉक्टर स्किझोफ्रेनियाचे निदान करतात. याशिवाय एम आर आय किंवा सिटी स्कॅन सारख्या तपासण्याही कराव्या लागतात.

**उपचार –** मनोविकारतज्ज्ञ डॉक्टर यावर समुपदेशन (कौन्सेलिंग) आणि औषधांच्या आधारे उपचार करतात. एंटीसायकोटिक औषधोपचार यावर प्रभावी असतो. डॉक्टरांनी दिलेली औषधे रुग्णाने नियमित वेळेवर घेणे आवश्यक असते. डॉक्टरांनी सांगितल्याशिवाय स्वत:हून औषध घेणे थांबवू नये.

**कुटुंबियांचे सहकार्य अपेक्षित –** स्क्रिझोफ्रेनियाच्या रुग्णांचं मानसिक खच्चीकरण मोठ्या प्रमाणावर होत असते. अशावेळी त्यांच्या नातेवाईकांची भूमिका महत्त्वाची असते. रूग्णाला औषधे वेळेवर देण्यात आणि सतत प्रोत्साहित करण्यात रुग्णाच्या सांभाळ करणाऱ्या घरच्यांची महत्वाची जबाबदारी असते.

## जिल्हास्तरीय पंच परीक्षेत क्रीडा शिक्षक रितेश तायडे उत्तीर्ण



**जळगाव –** गोदावरी फाऊंडेशन संचलित डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयातील क्रीडा शिक्षक रितेश विजय तायडे उत्तीर्ण झाले.

महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन, मुंबई संलग्नित जळगाव जिल्हा कबड्डी असोसिएशनतर्फे जिल्हास्तरीय पंच परिक्षेचे आयोजन करण्यात आले होते. जळगाव शहरातील बाहेती महाविद्यालयात घेण्यात आलेल्या परिक्षेत क्रिडा शिक्षक रितेश विजय तायडे चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले.

त्याबद्दल कबड्डी पंच प्रमाणपत्र देऊन रितेश विजय तायडे यांना गौरविण्यात आले. त्याबद्दल गोदावरी फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ.उल्हास पाटील, उपाध्यक्ष सुभाष पाटील, सचिव डॉ.वर्षा पाटील, सदस्या डॉ.केतकी पाटील, डॉ.वैभव पाटील, डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.एन.एस. आर्विकर, रजिस्ट्रार प्रमोद भिरुड, क्रीडा संचालक राजेंद्र गावंडे यांनी अभिनंदन केले.

### गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयातर्फे

## तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या आंतर महाविद्यालयीन ॲथलेटिक्स, बास्केटबॉल व खोखो स्पर्धा उत्साहात

**जळगाव –** डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या (बाटू) आंतर महाविद्यालयीन ॲथलेटिक्स, बास्केटबॉल व खो खो स्पर्धा दिनांक ७ नोव्हेंबर रोज़ी जिल्हा क्रीडा संकुल येथे उत्साहात संपन्न झाल्या. यात जळगाव, धुळे, नंदुरबार, नाशिक जिल्ह्यातील तंत्रशास्त्र महाविद्यालयातील २५० खेळाडू सहभागी झाले होते.

स्पर्धेचे उद्घाटन गोदावरी फाऊंडेशनच्या सचिव डॉ.वर्षा पाटील यांचे हस्ते झाले. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून बाटू विद्यापीठाच्या क्रीडा मंडळाचे सदस्य डॉ.व्ही.व्ही.महाजन, जळगाव विभाग क्रीडा समितीचे माजी सचिव डॉ.पी.आर. चौधरी, जळगाव जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनचे सचिव राजेश जाधव,



उपाध्यक्ष प्रा.हाजी ईकबाल मिर्झा, खो–खो चे राज्य क्रीडा मार्गदर्शक मिनल थोरात, जिल्हा बास्केटबॉल असोसिएशनचे प्र.सचिव जितेंद्र शिंदे यांची उपस्थिती होती. उपस्थितांचे स्वागत व कार्यक्रमाचे प्रास्ताविक गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील यांनी तर सूत्रसंचालन गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे क्रीडासंचालक तथा स्पर्धा आयोजक डॉ. आसिफ खान यांनी केले.


स्पर्धेत पंच म्हणून जळगाव जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनचे डॉ. पी.आर.चौधरी, राजेश जाधव, डॉ विजय पाटील, गिरीश पाटील, प्रा हाजी ईकबाल मिर्झा, प्रा.हरिश शेळके, प्रा.समीर घोडेस्वार, योगेश सोनवणे, सचिन महाजन, नितीन पाटील, देवानंद पाटील, विजय विसपुते, प्रसन्न जाधव, दिलीप चव्हाण, धीरज पाटील यांनी काम पाहिले. गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालय खो खो स्पर्धेत विजय जळगांव विभाग आंतर महाविद्यालय मैदानी व खोखो क्रीडा स्पर्धेत गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयाने खो खो च्या अंतिम सामन्यात डी.एन.पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय शिरपूर ला ५–४ ने पराभूत केले. ॲथलेटिक्स मध्ये गोदावरीच्या अमोल चौधरीने थाळी फेक प्रकारात प्रथम क्रमांक पटकवला. गोदावरी फ़ाउंड़ेशनचे अध्यक्ष डॉ. उल्हास पाटील, सचिव डॉ.वर्षा पाटील, डॉ.केतकी पाटील, डॉ.वैभव पाटील यांनी खेळाडुंच्या यशाबद्दल अभिनंदन केले. कार्यक्रम यशस्वितेसाठी गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालय व जळगाव जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशन, जळगाव जिल्हा बास्केटबॉल असोसिएशन व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांनी परिश्रम घेतले.

## संपादकीय...


# मंदीची लाट थोपविण्याचे आव्हान

करोना काळात जगातल्या बहुतेक सरकारांनी अर्थकारणात प्रचंड पैसा ओतला. तेव्हा ते गरजेचे होते. मात्र, या वाढत्या पैशाला तोलून धरेल इतकी प्रत्यक्ष आर्थिक वाढ झालेलीच नाही. त्यामुळे, स्वाभाविकच चलनवाढीचा चटका अधिक जाणवतो आहे. साऱ्या जगभरात सरासरी दोन टक्के चलनवाढ असायला हवी, असे जागतिक वित्तसंस्थांनी म्हटले होते. हे ध्येय गाठणे अवघडच नव्हे तर अशक्य बनले आहे. चलनवाढ याचाच अर्थ महागाई. यावर मार्ग म्हणजे जगातल्या सरकारांनी आता केवळ पैशाचे वाटप बंद करून दीर्घकालीन योजनांमध्ये गुंतवणूक करावी, अशी सूचना अर्थतज्ज्ञ करीत आहेत. करोना काळात जगातील बहुतेक सरकारांनी नागरिकांचे प्राण वाचविण्यास प्राधान्य दिले आणि प्रचंड प्रमाणात लोकहिताच्या योजना राबवून नागरिकांच्या हातात अनुदानरूपी पैसा किंवा थेट धान्य वा इतर वस्तू जातील, असे पाहिले. तो काळ आता संपला आहे, असे तज्ज्ञांना वाटते. जगातील कोणत्याही सरकारने आपणच यावच्चंद्रदिवाकरौ राज्य करणार आहोत, अशा भ्रामक समजुतीत राहून 'रेवडी संस्कृती' जोपासू नये, असा इशाराही तज्ज्ञ देत आहेत. या पार्श्वभूमीवर, भारतातील विकास दरातही मूळ अंदाजापेक्षा थोडी घट होण्याची शक्यता असून काही दिवसांपूर्वीच केंद्र सरकारने मोफत धान्य योजना अजून काही महिने चालू ठेवण्याचे ठरविले आहे, याचे स्मरण द्यायला हवे.

उदारीकरण आणि जागतिकीकरण झाल्यापासून कोणताही देश जागतिक अर्थप्रवाहांपासून दूर राहू शकत नाही. भारतही त्यात आला. भारताला असणारा एकच मोठा फायदा म्हणजे, भारताची देशांतर्गत बाजारपेठच प्रचंड मोठी आहे. त्याचप्रमाणे, कितीही औद्योगिकीकरण झाले तरी भारतीय अर्थकारणाला कृषी क्षेत्राचा एक भक्कम आधार आहे. त्यामुळेच, आज जगातील ब्रिटन, अमेरिका, जपान यांच्यासहित अनेक देशांमध्ये विस्कटून जाणाऱ्या आर्थिक घडीबाबत जी चिंता आहे; तितक्या प्रमाणात ती भारतात दिसत नाही. अर्थव्यवस्थेच्या आरोग्याचा एक निकष नेहेमीच करसंकलन हा असतो. वस्तू आणि सेवा कर म्हणजे जीएसटी संकलनाचे नवनवे विक्रम होतच आहेत. आता जीएसटी संकलनाचे सरासरी मासिक उत्पन्न दीड लाख कोटींच्या पुढे गेले आहे. ही वाढ गेल्या वर्षीपेक्षा २३ टक्के अधिक आहे. हे करसंकलन वाढणे, याचा एक अर्थ सरकारच्या लोककल्याणकारी योजनांसाठी पुरेसा पैसा उपलब्ध होणे, असा असतो. करोना काळात सुरू झालेले मोफत किंवा स्वस्त धान्यवाटप पुढे काही महिने चालू ठेवण्याचे सरकारने जाहीर केले; तेव्हा ही राजकीय खेळी असल्याचे म्हटले गेले. मात्र, अशा खेळीसाठीही पैशाचे सोंग आणता येत नाही. या सवलती देण्यासाठी तिजोरीत पैसा तर हवा! आता जागतिक अर्थवारे पाहता भारताच्या अर्थव्यवस्थेपुढे दोन प्रश्न उभे राहतील, असे दिसते. पहिला, मंदीचे जागतिक वारे भारताच्या सीमेवर थोपवून धरण्याचा प्रश्न आणि दुसरा, करोनोत्तर काळात देशांतर्गत विकासाने पकडलेली गती कायम ठेवतानाच चलनवाढीचा सामना करणे. पंतप्रधानांच्या अर्थविकास मंडळाचे सदस्य आणि अर्थतज्ज्ञ संजीव सन्याल यांनी जागतिक पर्यावरण अनुकूल असेल तर आपण नऊ टक्के विकासदर गाठू आणि तसे ते नसले तरी भारताचा विकासदर चालू आर्थिक वर्षात किमान सात टक्के राहील, असे म्हटले आहे. सात टक्के हाही विकासदर जगात सर्वांत जास्त असेल, असा अंदाज आहे. या अंदाजामागेही वाढत्या देशांतर्गत मागणीचे गणित आहे. काही काळापूर्वी चीन हे जगाच्या आर्थिक विकासाचे इंजिन असे म्हटले जाई. जागतिक मंदीची लाट थोपवून भारताने खरोखरच सात टक्क्यांच्या वर विकासाचा दर गाठला तर ते मोठे यश ठरेल.




# काचबिंदू




डोळ्यांनी पाहिलेली दृश्य माहिती ही ऑप्टिक नाडीद्वारे आपल्या मेंदूपर्यंत पोहचवत असते. मात्र या विकारात या महत्वाच्या नाडीवर परिणाम झालेला आढळून काचबिंदू हा दृष्टीविकार होत असतो. काचबिंदू आजाराला ग्लॅकोमा असे म्हणतात. यामुळे व्हिजन लॉस (दृष्टी कमी होणे) किंवा अंधत्वसुद्धा येऊ शकते.

### अशी घ्या काळजी

* दरवर्षी नियमित डोळ्यांची तपासणी करून घ्या.
* डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय कोणताही ड्रॉप्स डोळ्यात घालू नका.
* कुटुंबात काचबिंदूची अनुवंशिकता असल्यास जास्त काळजी घ्या.
* डायबेटीस असल्यास त्यावर डॉक्टरांकडून उपचार चालू ठेवा.
* ब्लडप्रेशर आटोक्यात ठेवा.
* डोळ्यात वेदना होत असल्यास, अस्पष्ट दिसत असल्यास तात्काळ दवाखान्यात जावे.





### - उपचार -

काचबिंदूवरील उपचाराचा उद्देश हा डोळ्यांच्या आतील प्रेशर कमी करणे व असलेली दृष्टी टिकवून ठेवणे हा असतो. याकरीता डॉक्टर काही आय ड्रॉप्स किंवा गोळ्या औषधे देऊ शकतात. या उपचारांनी फरक न पडल्यास किंवा द्रवपदार्थ वाहून नेणाऱ्या वाहिणीत ब्लॉकेज असल्यास शस्त्रक्रिया केली जाते आणि ही सुविधा डॉ.उल्हास पाटील रुग्णालयात उपलब्ध आहे.

### - लक्षणे -

डोळ्यात तीव्र वेदना होणे, अस्पष्ट व अंधुक दिसू लागणे, कडेच्या वस्तू न दिसणे, डोळे लाल होणे, डोके दुखणे, मळमळ व उलट्या होणे.

### - काचबिंदूचे निदान -

रुग्णातील लक्षणे, मेडिकल हिस्ट्री व डोळ्यांची तपासणी करून नेत्ररोगतज्ञ डॉक्टर याचे निदान करू शकतात. याशिवाय टोनोमेट्री टेस्ट करून डोळ्यातील प्रेशर तपासले जाईल. याशिवाय नाडीची तपासणी, पॅकीमेट्री टेस्ट व पेरीमेट्री टेस्ट यासुद्धा केल्या जातील.

### ग्लॅकोमा कोणाला होऊ शकतो..?

वयाच्या साठीनंतरच्या व्यक्ती, कुटुंबात काचबिंदूची अनुवंशिकता असणे, डोळ्याला दुखापत झालेल्या व्यक्ती, मधुमेही रुग्ण, हाय ब्लडप्रेशरचे रुग्ण, कॉर्टिकोस्टेरॉईड्ससारखी औषधे घेणाऱ्या व्यक्ती यांमध्ये काचबिंदू आजार होण्याचा धोका जास्त असतो.

### प्राचीन खान्देश-१

## खानदेशातील अश्मयुगीन स्थळे

# महाराष्ट्र आणि खानदेश

### प्रकरण ३ : विकास आणि नैसर्गिक स्थान

### अजिंठा लेणी

#### भौगोलिक स्थान



भौगोलिक किंवा विचार केला तर -झ्ख ने (geoscientific study of Ajanta cave) असा एक रिपोर्ट तयार केला आहे. अग्निजन्य खडक जो लाव्हारसाच्या राखेपासून बनला आहे रेडिओ कार्बन पध्दतीने काळ काढल्यावर तो साधारण सहा ते सात कोटी वर्षे जुना आहे. जमिनीतून लाव्हा बाहेर पडणे ही बराच काळ चालणारी प्रक्रिया असते हा गरम रस जसजसा थंड होत जातो त्यानुसार खडकाचे थर तयार होत जातात. काही लवकर थंड होतात तर काही उशिरा. या थंड व्हायच्या प्रक्रियेनुसार दोन प्रकारचा बेसाल्ट तयार होतो. छिद्र असलेला पण काटेरी रांगोळीचा दगड आणि दुसरा पक्का काळा काम्पक्ट दगड. याच बेसाल्टचे पुढे सिझनिंग होवून जांभा तयार होतो. जांभा कोकणात सापडतो कारण जास्त पाऊस आहे.




अजिंठ्याचे पठार उचलले गेल्यामुळे दरी तयार झाली. कोकणात गुहागरजवळ नैसर्गिक गुहांमध्ये आदिमानव रहात असल्याचे पुरावे मिळाले आहेत व त्यांच्या काळ चार ते पाच हजार वर्षे जुना आहे. त्यामुळे येथे ही तशी शक्यता नाकारता येत नाही. पण त्या दृष्टीने अभ्यास झालेला नाही. अजिंठा बद्दल जर भौगोलिक सखोल अभ्यास करायचा असल्यास लोणार बुलढाणा जवळचे त्याचा अभ्यास करावा लागेल. ज्वालामुखीमुळे की अशनीमुळे असा वाद सध्या चालू आहे. अजिंठ्यासारखी मोठी घळ तयार व्हायला तीन गोष्टीची आवश्यकता असते. एक जमिनीच्या पोटातील हालचाली मुळे भूस्तर वर उचलला जातो. दोन अस्थिबंधन (ligament) तयार होते. आणि अति पाऊस पडतो तेंव्हा जमिनीची धुप होत जाते. पॉइंटवरून संपूर्ण अजिंठा लेणीचा समूह एकाव वेळी नजरेच्या टप्प्यात येतो. घोड्याच्या नालासारखा डोंगराचा आकार, वाघूर नदीच्या प्रवाहाने केलेले डोंगराचे दोन भाग व पलीकडच्या भागात खोदलेला अजिंठा लेणीचा समूह त्यातील विहारांचे स्तंभ व चैत्यगृहांच्या कमानीमुळे अतिशय प्रेक्षणीय दिसतो.



सौ. सरला भिरुड
संशोधक व लेखिका

(क्रमशः)

# पाच लक्षणे; संकेत हृदय विकाराचे



थोडं पण कामाच हार्टअटॅक अचानक येत नाही, त्यापूर्वी दिसतात हृदयरोगाची अनेक लक्षणे वारंवार दिसणारे काही संकेत असतात गंभीर उशीर होण्यापूर्वीच उपाय करण्याची असते जाणून घेऊया, हृदय कमकुवत होत चालल्याची कुठली लक्षणे दिसून येतात, याबाबत.

* **छातीत वेदना होणे** – जर तुमच्या छातीत वारंवार वेदना होत असतील आणि छाती भरून आल्यासारखे वाटत असेल, तर ही धोक्याची घंटा समजण्यात यावी, तुम्हाला हृदयाशी संबंधित काही विकार जडल्याचे हे लक्षण असू शकते.
* **उलटी होणे** – काही वेळ छातीत दुखणे आणि त्यानंतर उलट्या होणे, अशी लक्षणे काही जणांना जाणवतात. हृदयरोगाशी संबंधित हे एक अतिशय गंभीर लक्षण मानले जाते.
* **पोटात दुखणे** – पोटात दुखण्याची अनेक कारणे असू शकतात. मात्र हृदयाशी संबंधित काही विकार असेल, तरीही पोटात दुखण्याची शक्यता असते. ।.
* **जबड्यात वेदना** – जर वारंवार तुमचा जबडा दुखत असेल, तर हे हृदयरोगाचे लक्षण असू शकतं.
* **अचानक घाम येणे** – अनेकांना एसी रूम मध्ये बसलेले असताना किंवा विनाकारण घाम येतो. असा घाम येणे, हे धोक्याचे लक्षण मानले जाते. तुम्हालाही असाच अनुभव येत असेल, तर तातडीने वैद्यकीय तपासणी करून घेण्याचा सल्ला दिला जातो.

हृदयरोगाच्या लक्षणांची संबंधित या काही सामान्य टिप्स आहेत. तुम्हाला याबाबत काही गंभीर प्रश्न अथवा समस्या असतील, तर डॉक्टरांच्या सल्ल्याने उपचार घेणे आवश्यक आहे.

# महाराष्ट्रातील पाहण्यासारखे ठिकाण गोवा

भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर वसलेले एक खिशाच्या आकाराचे नंदनवन, गोवा हे पोर्तुगीज-भारतीय वारशाचे कॅलिडोस्कोपिक मिश्रण आहे, स्वादिष्ट पदार्थ आणि अर्थातच शांत समुद्रकिनारे. जगण्याच्या सुसेगड तत्त्वज्ञानाने, या सूर्यप्रकाश राज्याने जगभर प्रसिद्धी मिळवली आहे. अशा सहज-जाणाऱ्या व्हायब्ससह, ही छोटी स्थिती तुम्हाला निश्चिंत बनवते आणि तुम्हाला आरामशीर जीवनशैलीचा आनंद घेण्यासाठी तुमचा वेळ काढू देते.

१००-किलोमीटर लांबीच्या किनारपट्टीवर बढाई मारून, गोव्यामध्ये अखंड सोनेरी वाळूचे किनारे आहेत जे वर्षभर अनेक पर्यटकांना चालना देतात. हे किनारे प्रत्येक उष्णकटिबंधीय लहरींची पूर्तता करतात- बॅकपॅकर्सच्या आवडत्या अरामबोल किंवा अधिक ठळक बागा बीचमधून निवडा; शांत मँडरेम किंवा पाम-फ्रिंग्ड पालोलेम किंवा कदाचित अंजुना बीचच्या आनंदी हिप्पी मार्केटचा आनंद घ्या. प्रशंसा



करण्यासाठी पंचतारांकित गुणधर्मांनी सजवलेले खाजगी समुद्रकिनारे किंवा तुमच्यासाठी लपलेले खोरे देखील आहेत.

मोहक सीफूड आणि गजबजणाऱ्या नाइटलाइफसाठी गोवा जगभरात ओळखला जातो. बीच शॅक्स, ट्रेंडी बार, चैतन्यशील क्लब, भव्य कॅसिनो आणि मोहक कॅफे यांच्या समृद्ध संग्रहासह, राज्य भारतात सर्वांत आश्चर्यकारक नाइटलाइफ अनुभवू शकतो.

पूर्वीच्या काळात पोर्तुगीज वसाहत म्हणून ओळखले जाणारे, गोवा वसाहती काळापासून बरोक वास्तुकला देखील दाखवते. जुन्या पद्धतीचे बंगले, प्राचीन किल्ले, पांढरे-धुतलेले चर्च यांत ते अगदी स्पष्ट दिसते.

रंगीबेरंगी कॅथोलिक समारंभ आणि आकर्षक कॅथेड्रल तुम्हाला गोव्याच्या संस्कृतीची माहिती देतात. या सर्वांसह आणि अनुभव घेण्यासारखे बरेच काही, गोव्यामध्ये खरोखरच सुट्टीसाठी परिपूर्ण पाककृतीसाठी सर्व घटक आहेत.

रोहित अग्रवाल,
सहा.प्राध्यापक,
हरीभाऊ जावळे इन्स्टीट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट केटरिंग टेक्नॉलॉजी

# देवस्थान :- औदुंबर

कृष्णेच्या प्रशस्त अशा घाटावर मध्यभागी औदुंबर वृक्षाखाली मंदिर आहे. मंदिरातच नृसिंह सरस्वती स्वामींनी स्थापन केलेल्या दत्तपादुका आहेत. वाडीहून गाणगापूरला जाताना योगिनींच्या आग्रहावरून स्वामींनी वालुकामय पाषाणाच्या या पादुकांची स्थापना केली. पादुकांची पूजाअर्चा येथे अखंड सुरू असते. दत्तसंप्रदायात श्री दत्तगुरूंचे तिसरे अवतार मानले गेलेले श्री नृसिंह सरस्वती यांनी औदुंबर वृक्षांनी बहरलेल्या या अरण्यभूमीत १२ वर्षे वास्तव्य केले. यानंतर जेव्हा ते गाणगापूरला जायला निघाले तेव्हा योगिनींच्या आग्रहावरून त्यांनी आपल्या पादुका इथे ठेवल्या. या वालुकामय पाषाणाच्या पादुकांना 'मनोहर पादुका' असे नाव आहे. या पादुकांची मध्यान्ही पूजा केली जाते. नदीवरचा घाट एकनाथ महाराजांनी बांधला असल्याचे सांगितले जाते. याच घाटावर वासुदेवानंद सरस्वतींचेही स्मृतिमंदिर आहे.



नदीचे पात्र, घाट, देऊळ, त्यामागचा औदुंबरचा पार हे सारे अगदी चित्रमय भासते आणि परिसरातले शांत, काहीसे पारंपरिक, प्रसन्न वातावरण मनाला भावते.

या मंदिराभोवती मोठा गोलाकार मंडप असून त्याला चारही बाजूंला उंच व विस्तृत खांब आहेत. मधोमध श्रीगुरू ज्या औदुंबर वृक्षाखाली बसत असत तो वृक्ष आणि त्याखाली कृष्णा नदीसन्मुख त्या मनोहर पादुका आहेत व त्यापुढे थोडी मोकळी जागा आहे. त्याच ठिकाणी पुजारी बसतात व आतील गाभार्यातील पादुकांची पूजा करतात. या गाभार्याचे दार अतिशय लहान आहे. पादुका ज्या सभागृहात आहेत त्याच्या दर्शनी भागावर चांदीचा अलंकृत पत्रा मढविला आहे. मधोमध गणेशपट्टी, त्यावर आजूबाजूला मयूर व जय-विजय आणि त्यांच्या वरील बाजूस नृसिंह सरस्वती महाराजांची प्रतिमा उठवलेली आहे. पुजारी जेथे आसनस्थ होऊन पूजा करतात, त्यांच्या एका बाजूला श्री गणेशाची भव्य मूर्ती स्थापिली असून तिचीही पूजा होते.

नरसोबाच्या वाडीचा उल्लेख अमरापूर या नावाने गुरुचरित्रात आला आहे. त्यामुळे हे ठिकाण दत्तभक्तांच्या दृष्टीने महत्त्वाचे मानतात. इथे नृसिंह सरस्वतीच्या मंदिराव्यतिरिक्त रामचंद्र योगी यांचीही समाधी आहे. याशिवाय नारायण स्वामी, काशीकर स्वामी, गोपाल स्वामी, मौनी स्वामी इत्यादींची समाधी मंदिरे आहेत

## सुविचार

अडणीच्या वेळेत सगळ्यात मोठा आधार म्हणजे स्वत:वर विश्वास जो मंद हास्य करत तुमच्या कानात प्रेमाने सांगत असतो सगळं व्यवस्थित होईल.

## संत तुकाराम सार्थ गाथा



### अभंग क्र. ४२

वृत्ति भूमि राज्य द्रव्य उपार्जिती।जाणा त्या निश्चितीं देव नाहीं ।।१।।
भाडेकरी वाहे पाठीवरी भार । अंतरींचें सार लाभ नाहीं ।।ध्रु.।।
देवपूजेवरी ठेवूनियां मन । पाषाणा पाषाण पूजी लोभें ।।२।।
तुका म्हणे फळ चिंतिती आदरें । लाघव हे चार शिंदळीचे ।।३।।

अर्थ – भूमी, राज्य, द्रव्य यांच्या लोभान जो हरिभक्ती करतो त्याला देव भेटत नाही हे निश्चीत जाणावें.हमाल पाठीवर ओझे वाहतो, पण त्याच्या ओझ्यामधील कोणत्याही वस्तुचा त्याला लाभ होत नाही.मनामधे इच्छा-आकांक्षा ठेउन देवाची पूजा करणारा पाषाणासारखा असतो. असा पाषाणच पाषाणाची पूजा करतो.तुकाराम महाराज म्हणतात मनामधे विषयाची लालसा धरून केलेले कर्म हे वेष्याच्या शिंदळकि प्रमाणे असतात.

## सप्ताहातील दिनविशेष

दि. १४ – बाल दिन.
दि. १४ जैवतंत्रज्ञान दिन
दि. १९ राष्ट्रीय शिक्षण दिन
दि. १९ जागतिक शौचालय दिन







## पाककृती
### टोमॅटो चटणी

**साहित्य:** ४, ४ टोमॅटो चिरलेले, २ कांदे चिरलेले, २ चिरलेल्या लसणाच्या पाकळ्या, १ लहान चमचा तेल, १ अखंड लाल मिरची, मीठ स्वादानुसार, साखर स्वादानुसार, फोडणीसाठी:, १ लहान चमचा तेल, अर्धा लहान चमचा मोहरी, ६-८ कडीपत्त्याची पाने.



**कृती:** १. एक कढईत तेल गरम करा त्यात कांदा, लाल मिरची आणि लसूण घालून परता. नंतर टोमॅटो घाला आणि टोमॅटो मऊ होईपर्यंत जवळजवळ १० मिनिटे शिजवा.
२. मिश्रण थंड करा. थंड झाले की मीठ आणि साखरेबरोबर सर्व ब्लेंडरमध्ये घाला आणि एकदम बारीक होईपर्यंत वाटा.
३. नंतर फोडणीसाठी पॅनमध्ये तेल गरम करा आणि त्यात मोहरी घाला. मोहरी तडतडायला लागली की कडीपत्ता घाला.
४. याला मिश्रणावर घाला आणि नीट एकजीव करा. नंतर चटणीला तुमच्या आवडीच्या नाश्त्याबरोबर वाढा.

## पेंच व्याघ्र प्रकल्प



भारत सरकारच्या राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण (एनटीसीए) ने मॅनेजमेंट इफेक्टिव्हनेस इव्हॅल्युएशन ऑफ टायगर रिझर्व्ह इन इंडिया बाबत सन २०१४-१५ मध्ये केलेल्या अभ्यासात राज्यातील मेळघाट, पेंच आणि ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाला व्हेरी गुड असा दर्जा दिला आहे म्हणजे काय तर व्याघ्रसंवर्धनासाठी इथे अत्यंत पोषक वातावरण असून त्याचा दर्जा अत्यंत उत्कृष्ट आहे.

या राखीव क्षेत्रातून उत्तर दक्षिण वाहणाऱ्या जीवनदायिनी पेंच नदीचे नाव या व्याघ्र प्रकल्पाला देण्यात आले आहे. हा व्याघ्र प्रकल्प पेंच नदीमुळे पूर्व पेंच आणि पश्चिम पेंच अशा दोन भागात विभागला गेला आहे. पेंच राष्ट्रीय उद्यान आणि व्याघ्र प्रकल्प २५७.२६ चौ.कि.मी क्षेत्रात विस्तारला आहे. १९७५ साली महाराष्ट्र शासनाने हे राष्ट्रीय उद्यान घोषित केले आणि फेब्रुवारी १९९९ मध्ये याला व्याघ्र प्रकल्पाचा अधिकृत दर्जा मिळाला.

नागपूरहून अवघ्या ७० कि.मी. अंतरावर असलेले पेंच अभयारण्य निसर्गप्रेमींना पक्षी निरिक्षकांना, छायाचित्रकारांना आणि चार दिवस सलग सुट्टी असलेल्या सर्व निसर्ग पर्यटकांना सतत खुणावत असते.

नव्यानेच मानसिंगदेव वन्यजीव अभयारण्याचे १८२.५८० चौ.कि.मी. चे अतिरिक्त क्षेत्र या व्याघ्र प्रकल्पात समाविष्ट करण्यात आले आहे. महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश राज्याच्या सीमेवरचा हा व्याघ्रप्रकल्प जैवविविधतेने संपन्न प्रदेश असून येथे गोंड आणि भिल्ल आदिवासी राहातात. त्यांच्या जगण्याच्या अनोख्या परंपराबरोबर पळसाच्या पानापासून तयार करण्यात येणारी पत्रावळ आणि द्रोण बनविण्याचे त्यांचे कौशल्यही पाहण्यासारखे असते.




जैवविविधतेने समृद्ध अधिवास असलेल्या या प्रकल्पात वाघ, चित्ता, जंगली मांजर, जंगली कुत्रा, तरस, कोल्हा, सांबर, हरणं, गवे, नीलगायी, चार शिंग असलेले काळवीट, अस्वल, घुबड यासारखे प्राणी पाहायला भेटतात.

## कॉम्बिनेशन त्वचा

सकाळी उठल्यानंतर सर्व प्रथम त्वचेची काळजी स्वच्छतेपासून सुरू होते. यासाठी तुम्ही कोणतेही क्लिन्झर वापरू शकता. क्लींजिंगमुळे चेहऱ्यावर जमा झालेली सर्व घाण, धूळ आणि मृत त्वचा सहज निघून जाते. त्यामुळे सकाळी चेहऱ्यावर क्लिंजर लावावे. हळद, चंदनाचा फेसपॅक यासाठी तुम्ही २ चमचे चंदन पावडर घ्या. त्यात चिमूटभर हळद आणि गुलाबजल टाका. आता ही पेस्ट चेहऱ्यावर लावा. १५-२० मिनिटांनी चेहरा ताजे पाण्याने धुवा. यामुळे तुमचा चेहरा मुलायम आणि चमकदार होईल. टोनर, मॉईश्चरायझर लावा. मॉइश्चरायझर कॉटन बॉलच्या मदतीने चेहऱ्यावर लावा किंवा स्प्रे करा.

### कॉम्बिनेशन त्वचा

तुमच्या टी झोन म्हणजे नाक व कपाळावर जर तेल जमा होत असेल आणि बाकी ठिकाणी ड्राय फ्लेक्स असतील तर तुमची त्वचा ही कॉम्बीनेशन स्कीन आहे.

### संवेदनशील त्वचा

ही सर्वात जास्त त्रायदायक त्वचा आहे. अशा त्वचेच्या बाबतीत टिश्युवर ड्रायफ्लेक्स येतात. त्वचा टाईट होते आणि रेडनेस, खाज आणि इरिटेशन असा त्रास सुरू होतो. अशी त्वचा अतिशय डेलिकेट असून, या त्वचेची जास्त काळजी घ्यावी लागते.



### त्वचेचा कर्करोग - मुख्य लक्षणे

त्वचेवर अतिरिक्त पेशींमुळे गाठ येणे, त्वचेवर न भरुन येणारा घाव, अल्सर मस किंवा मस्सा गतीने वाढणे. यातून रक्त निघू लागणे, त्वचेवर व्रण निर्माण होणे, वजन कमी होणे, भूक न लागणे, सतत ताप येणे ही लक्षणे असतात.

### सोरायसीस

सोरायसीस ही त्वचेसंबंधी एक समस्या असून, यामध्ये त्वचेच्या पेशींची जलदपणे वाढ होते, त्वचेवर लालसर सूजयुक्त चट्टे येतात व तेथून पापुद्रे किंवा खवले निघत असतात. याला सोरायसीस असे म्हणतात.

स्किन संबंधित समस्यांसाठी
आजच संपर्क साधा
डॉ.दिनेश कुलाळ
८४५९३९४८१३



## चेंडू स्फटिकाचा

नासिरला त्याच्या बागेतल्या वडाच्या झाडामागे एक स्फटिकाचा चेंडू सापडला. जेव्हा झाडाने त्याला सांगितले की हा चेंडू तुझी मनोकामना पूर्ण करेल तेव्हा नासीर ने खूप विचार केला पण त्याला काय मागावं हे सुचलं नाही. त्यामुळे त्याने तो स्फटिकाचा चेंडू पिशवीत ठेवला, आणि मनोकामना सुचण्याची वाट बघण्याचे ठरवले. दिवसामागून दिवस गेले पण त्याने मनातली इच्छा मागितली नाही, पण त्याच्या एका चांगल्या मित्राने नासिरला स्फटिकाच्या चेंडूकडे पाहताना पाहिलं. त्याने तो नासीर कडून चोरला आणि गावातल्या सगळ्यांना दाखवला. त्या सगळ्यांनी सोने आणि राजवाडे मागितले. पण प्रत्येक जण एकच इच्छा मागू शकत होता.



आता सगळ्यांकडे फक्त सोने आणि आलिशान राजवाड्यांव्यतिरिक्त काहीही नव्हतं. सगळेजण उदास झाले आणि त्यांनी नासिरकडे मदत मागायचे ठरवले. नासिरने मनोकामना व्यक्त केली की, गावकऱ्यांनी लोभीपणापायी जे गमावलं ते पूर्ववत होऊदे. राजमहाल आणि सोने गायब झाले आणि सगळे गावकरी अधिसारखेच आनंदी आणि समाधानी झाले.

**तात्पर्य: पैसे आणि संपत्ती मधून आनंद मिळत नाही.**

साप्ताहिक गोदावरी परिवार

# चोवीस वर्षीय तरुणाचा मधुमेहामुळे आला जीव धोक्यात
# रुग्णालयातील एमआयसीयूतील तज्ञांमुळे रुग्णाला जीवदान

**जळगाव – जन्म:च जडलेल्या मधुमेहाच्या २४ वर्षीय रुग्णाची साखर अधिकच वाढल्याने त्याची प्रकृती गंभीर झाली होती. डॉ.उल्हास पाटील रुग्णालयातील एमआयसीयूमध्ये तज्ञांद्वारे करण्यात आलेल्या उपचाराअंती रुग्णाला जीवदान मिळाले.**

सविस्तर वृत्त असे की, डॉ.उल्हास पाटील रुग्णालयात एकाच छताखाली सर्व प्रकारचे उपचार केले जात असून अतिगंभीर रुग्ण देखील बरे होवून जातात याचा अनुभव अनेकांना येत असून त्यापार्श्वभूमीवर जळगाव येथील रहिवासी असलेला प्रविण (नाव बदललेले) ह्या २४ वर्षीय तरुणाला जन्म:च गंभीर स्वरुपाचा मधुमेह जडला. रुग्णालयात दाखल केले असता त्यावेळी रुग्णाची साखर ५०० हून अधिक होती आणि तो बेशुद्ध होता.



मेडिसीन विभागाच्या अतिदक्षता विभागात मेडिसीन तज्ञ डॉ.चंद्रेय्या कांते, डॉ.पूजा तन्नीरवार यांच्या मार्गदर्शनाखाली रुग्णावर उपचार करण्यात आले. रुग्ण दोन आठवडे बायपॅक व्हेंटीलेटरवर होता. महात्मा ज्योतिबा फुले योजनेतून उपचार करण्यात आले. तसेच योजनेचा कालावधी उलटून गेल्यानंतरही रुग्णाला औषधींसह उपचारांची गरज असल्याने तब्बल ३० ते ३५ हजार रुपयांचा खर्च रुग्णालयाने स्वत: करीत रुग्णाला बरे केले. सर्वप्रथम इन्सुलिन देत रुग्णाची वाढलेली साखर नियंत्रणात करण्यात आली, त्यानंतर गोळ्यांवर आणत रुग्णाची प्रकृती स्थिर करण्यात आली. यांनी केली देखभाल रुग्णालयातील अतिदक्षता विभागात निवासी डॉक्टरांसमवेत एमआयसीयूतील ब्रदर हर्षल सयाजी (इंचार्ज), स्वरुपा, गौरी, मौनी, राहूल यांनी रुग्णाची देखभाल केली.

फिजीओथेरपीचेही सहाय्य मेडिकल ट्रिटमेंटसोबतच रुग्ण प्रविणला फिजीओथेरपीचीही आवश्यकता होती. त्यामुळे दररोज निवासी डॉ.वैष्णवी सैंदाणे, डॉ.विशाल मोरे यांनी फिजीओथेरपी केली. त्यामुळे रुग्ण बरा होण्यास सहाय्य झाले.

## वाकटुकी येथे आज आरोग्य शिबिर

**वाकटुकी** – ग्रामपंचायत कार्यालयाच्या पुढाकाराने आणि गोदावरी फाऊंडेशनच्या सहकार्याने सोमवार, १४ रोजी वाकटुकी येथे महाआरोग्य तपासणी शिबिर होणार आहे. शिबिरात ईसीजी कार्डिओग्राफ, रक्तदाब तपासणीसह कान-नाक-घसा विकार, नेत्रविकार, स्त्रीयांच्या मासिक पाळी, वंध्यत्व, गर्भपिशवी विकार, हृदयविकार आदि आजारांची तज्ञांद्वारे तपासणी केली जाणार आहे. अधिक माहितीसाठी सरपंच भागाबाई पाटील, रविंद्र पाटील, उपसरपंच निवृत्ती सोनवणे, संदिप पाटील, महेश्वरी पाटील, संजू कोळी, रेखा पाटील, पंढरीनाथ कोळी यांच्याशी संपर्क साधावा.

## सुरवाडेतील हृदयविकारींसाठी टू-डी इको तपासणी शिबिर ठरले वरदान

**बोदवड** – सरपंच व ग्रामपंचायत कार्यालय सुरवाडे बुद्रुक आणि गोदावरी फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत टू डी इको तपासणी शिबिर, ईसीजी कार्डिओग्राफ, रक्तदाब तपासणी करण्यात आली.

ग्रामपंचायत कार्यालयात सकाळी १० वाजता शिबिरास सुरुवात झाली. शिबिरात आलेल्या हृदयविकारी रुग्णांसाठी शिबिर वरदान ठरले. कारण येथे हृदयाची सोनोग्राफी अर्थात टू डी इको तपासणी अगदी मोफत करण्यात आली, यावेळी रुग्णांना रिपोर्टही देण्यात आला. याशिवाय विविध आजारांची तपासणीही करण्यात आली. यावेळी निवासी डॉ.जीवक काकडे, डॉ.अमेय लोखंडे, डॉ.आशुतोष, डॉ.पियुष, इंटर्न प्रतिविराज, सायली यांनी रुग्णांची तपासणी केली.



यावेळी सरपंच श्रीकांत कोळी, उपसरपंच मनोहर सुरवाडे, गणेश पाटील, मनोज गायकवाड, कैलास पाटील, सोपान सुरवाडे, काशिनाथ गायकवाड, बिरबल धुरंधर, हेमलता पाटील आदिंनी सहकार्य केले.

## दहिदुलेत सोमवारी आरोग्य शिबिर

**दहिदुले** – ग्रामपंचायत कार्यालय व गोदावरी फाऊंडेशनतर्फे सोमवार, १४ नोव्हेंबर रोजी सकाळी १० ते २ या वेळेत महाआरोग्य तपासणी शिबिर आयोजित केले आहे.

जिल्हा परिषद येथे होणाऱ्या शाळेत मोफत ईसीजी कार्डिओग्राफ, रक्तदाब तपासणीसह कान-नाक-घसा विकार, नेत्रविकार, स्त्रीयांच्या मासिक पाळी, वंध्यत्व, गर्भपिशवी विकार, हृदयविकार आदि आजारांची तज्ञांद्वारे तपासणी केली जाणार आहे. अधिक माहितीसाठी गोकुळ पाटील, सुदर्शन पाटील, दिलावर पिंजारी यांच्याशी संपर्क साधावा.

## रोजगार वार्ता

**पदाचे नाव** –हृदयरोगतज्ज्ञ , नेफ्रोलॉजिस्ट (सुपर स्पेशालिस्ट), स्त्रीरोगतज्ञ , बालरोगतज्ञ , सर्जन , रेडिओलॉजिस्ट , भूलतज्ज्ञ, फिजिशियन, ऑर्थोपेडिक (विशेषज्ञ), नेत्ररोगतज्ज्ञ, नेत्ररोगतज्ज्ञ, वैद्यकीय अधिकारी, क्लिनिकल सायकोलॉजिस्ट (NMHP), वैद्यकीय अधिकारी, मानसोपचारतज्ज्ञ सामाजिक कार्यकर्ता, ऑडिओलॉजिस्ट, सुविधा व्यवस्थापक ई- सुश्रुत, आहारतज्ञ, समुपदेशक, श्रवणक्षम मुलांसाठी प्रशिक्षक, मानसोपचार परिचारिका, फिजिओथेरपिस्ट, सांख्यिकी अन्वेषक, कार्यक्रम सहाय्यक डीईओ, लेखापाल, पॅरा मेडिकल वर्कर, एमटीएस (मलेरिया तांत्रिक पर्यवेक्षक), दंत तंत्रज्ञ, डायलिसिस तंत्रज्ञ, कोल्ड चेन तंत्रज्ञ, दंत स्वच्छता, सीटी स्कॅन तंत्रज्ञ, बीएसयू तंत्रज्ञ, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, STS (वरिष्ठ उपचार एसटी पर्यवेक्षक), STLS (वरिष्ठ क्षयरोग प्रयोगशाळा पर्यवेक्षक), स्टाफ नर्स. **पदसंख्या** – २८० जागा **शैक्षणिक पात्रता** – शैक्षणिक पात्रता पदाच्या आवश्यकतेनुसार आहे .(मूळ जाहिरात वाचावी.) **नोकरी ठिकाण** – ठाणे

**वयोमर्यादा** – खुला प्रवर्ग – १८ ते ३८ वर्षे मागासवर्गीय प्रवर्ग – १८ ते ४३ वर्षे वैद्यकीय अधिकारी, विशेषज्ञ, अतिविशेषतज्ञ – ६५ वर्षे. इतर पदे (परिचारिका, अधिपरिचारिका, तंत्रज्ञ, समुपदेशक, औषध निर्माता) – ६५ वर्षे MBBS, स्पेशालिस्ट – ७० वर्षे

**अर्ज शुल्क** –खुला प्रवर्ग – रु. ३००/- राखीव प्रवर्ग – रु. २००/- **अर्ज पद्धती** – ऑफलाईन **अर्ज पाठविण्याचा पत्ता** –जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय, ४ था मजला, राष्ट्रीय आरोग्य अभियान, कन्या शाळा आवार, जिल्हा परिषद, ठाणे **अर्ज करण्याची शेवटची तारीख** – २१ नोव्हेंबर २०२२ **अधिकृत वेबसाईट** – arogya.maharashtra.gov.in


APPROVED AFFILIATED ACCREDITED
Visit us at www.gfgcoe.in

GODAVARI COLLEGE OF ENGINEERING JALGAON
Estd. 1999



B. Tech Engineering Direct 2nd Year

| Bachelor of Technology ( B.Tech) | Cap Code |
|---|---|
| Computer Engineering | 517124510 |
| Electrical Engineering | 517129310 |
| Mechanical Engineering | 517161210 |
| E & TC Engineering | 517137210 |

NAAC Accredited College

College Code 5171

A Tradition of Excellence........Since1999

CAP-II Option Form Dates 12th to 14th November 2022

GODAVARI COLLEGE OF ENGINEERING ,JALGAON
Affiliated to Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere
Contact Us:-Prof. M. N. Patil 7507075171 Dr. N. N.Bhole 9370060014 Prof. I. S. Jadhav 7769093300
P-51, M-Sector, Addl M.I.D.C., Bhusawal Road, Jalgaon-425003 (M.S.)